जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १९४ | मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## थेऊर गट व गण राष्ट्रवादीचाच कायम राहणार : माजी सरपंच संतोष कुंजीर

### अजित दादांना खरी श्रद्धांजली म्हणजे विजय

थेऊर जिल्हा परिषद गटातून कोमल संदेश आव्हाळे, आव्हाळवाडी पंचायत समिती गणातून सुषमा मुरकुटे आणि थेऊर पंचायत समिती गणातून युवराज काकडे हे राष्ट्रवादीचे तिन्ही उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात ताकदीने उतरले आहेत. या तिन्ही उमेदवारांचा विजय हीच अजित दादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा स्पष्ट आदेशवजा संदेश संतोष कुंजीर यांनी कार्यकर्त्यांना यावेळी दिला.

**लोणी काळभोर, ता. २ :** थेऊर जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले आहे. कुणी कितीही आटापिटा केला, कितीही डावपेच आखले तरी थेऊर गट व गण राष्ट्रवादीचाच राहणार असून तीनही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा दावा कुंजीरवाडीचे माजी सरपंच संतोष कुंजीर यांनी केला आहे.

आळंदी म्हातोबाची (ता. हवेली) येथील श्री. म्हातोबा मंदिर परिसरात रविवारी (ता. १) सकाळी आयोजित कोपरा सभेत ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करत कुंजीर यांनी, अजित दादांचा विकासाचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांवर आहे, असे ठामपणे सांगितले.

पुढे बोलताना संतोष कुंजीर म्हणाले की, थेऊर हा केवळ मतदानाचा भाग नाही, तर राष्ट्रवादीच्या रक्तात भिनलेला विकासाचा किल्ला आहे, थेऊर हा केवळ भौगोलिक भाग नाही, तर राष्ट्रवादीच्या विचारांचा, विकासाचा आणि जनतेच्या विश्वासाचा गड आहे. गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसने या भागात रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची अनेक ठोस कामे केली



आहेत. त्यामुळे जनतेचा विश्वास आजही राष्ट्रवादीवरच आहे.

निवडणूक जवळ आली की काही लोकांना विकासाची अचानक आठवण होते. खोटे आश्वासन, अफवा आणि टीकेच्या जोरावर सत्ता मिळवण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना थेऊरच्या जनतेने यापूर्वीही धडा शिकवला आहे आणि यावेळीही शिकवेल. राष्ट्रवादीचे उमेदवार हे जनतेतून आलेले, काम करणारे आणि लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे आहेत, तर विरोधकांकडे केवळ भाषणबाजी आणि आरोपांचे राजकारण असल्याचा आरोपही त्यांनी केला.

राष्ट्रवादीचे उमेदवार हे जमिनीवर काम करणारे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारे आणि गावागावात विश्वास निर्माण करणारे असल्याचे कुंजीर यांनी ठामपणे अधोरेखित केले. शेतकरी, कामगार, महिला, युवकसर्व समाजघटक आज राष्ट्रवादीच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. त्यामुळे विजय केवळ निश्चित नाही, तर ऐतिहासिक असणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यकर्त्यांना स्फुर्ती देताना कुंजीर म्हणाले, विजय समोर दिसतोय, पण शेवटचा श्वास घेईपर्यंत प्रचारात धार ठेवावी लागेल. घराघरात जाऊन राष्ट्रवादीचा विकासाचा लेखाजोखा मांडला, तर विरोधकांचा नामोनिशाण उरणार नाही. सभेत उपस्थित कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

# लोणी काळभोर गटात भाजपचा विकासाचा फॅक्टर चालणार

## उमेदवारांना जनतेची साथ असल्याने विजय निश्चित : चित्तरंजन गायकवाड

**लोणी काळभोर, ता. २ :** राज्यभरात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना पुणे जिल्ह्यातील लोणी काळभोर जिल्हा परिषद गट सध्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या गटात भाजपच्या विकासकामांचा फॅक्टर निर्णायक ठरेल आणि भाजपच्या तिन्ही उमेदवारांना जनतेचा पाठिंबा मिळेल, असा विश्वास लोणी काळभोरचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड यांनी व्यक्त केला आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी पूनम गायकवाड, लोणी काळभोर पंचायत समिती गणातून श्वेता काळभोर, तर लोणी काळभोर-कदमवाकवस्ती गणातून ज्ञानेश्वर नामुगुडे हे भाजपचे उमेदवार रिंगणात आहेत. या तिन्ही उमेदवारांच्या प्रचारासाठी चित्तरंजन गायकवाड यांनी पूर्ण ताकद लावली असून, भाजपच्या विचारधारेतून अंत्योदयाचा संदेश शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.




'पुणे प्राईम न्यूज'शी बोलताना गायकवाड म्हणाले की, भाजपचे तिन्ही उमेदवार नवखे असले तरी ते एक गट म्हणून काम करत आहेत. राजकीय पार्श्वभूमी नसल्यामुळे व्यक्तिगत स्वार्थाऐवजी विकासाला प्राधान्य दिले जाईल. त्यांनी कदम वाकवस्ती परिसरात गेल्या आठ वर्षांत सव्वा दोन कोटी रुपयांची विकासकामे झाल्याचा दावा करत, मतदारांच्या अपेक्षेपेक्षा अधिक चांगले काम करण्याची ग्वाही दिली.

महिला उमेदवारांबाबत बोलताना त्यांनी भाजपमध्ये महिलांना निर्णयस्वातंत्र्य दिले जाते, असे सांगितले. २०१७ ते २०२२ या काळात पूनम गायकवाड यांनी सव्वाशे कोटी रुपयांची विकासकामे केली. आगामी काळातही जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये महिला प्रतिनिधी सक्षमपणे काम करतील, असे ते म्हणाले.

लोणी काळभोर गटातील तिन्ही गावांचा संतुलित विकास साधला जाईल, आवश्यक निधीचे योग्य नियोजन केले जाईल आणि सर्व समाजघटकांचा समावेश असलेला विकास आराखडा तयार केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. विरोधकांवर टीका करताना गायकवाड म्हणाले की, विरोधकांकडून अनावश्यक टीका आणि खोटे आरोप सुरू आहेत. लोकसंख्येनुसार नियोजन, कचरा प्रकल्प किंवा विकास आराखडा याबाबत त्यांनी काहीच केले नाही.

जिल्हा परिषदेच्या शाळांबाबत बोलताना त्यांनी, झेडपी शाळा भविष्यात देशाचे नेतृत्व घडवणाऱ्या ठरल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले. आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण आणि कचरा व्यवस्थापन प्रकल्प मार्गी लावण्यावर भर दिला जाईल, तसेच कदमवाकवस्तीला पुणे शहरासारखी विकसित करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

महिला सुरक्षेसाठी ग्राम पंचायतीमार्फत गाडी, कर्मचारी आणि सीसीटीव्ही बसवण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. युवकांच्या रोजगारासाठी केंद्र व राज्य सरकारच्या योजनांच्या माध्यमातून उद्योजकतेचे प्रशिक्षण दिले जाईल आणि भविष्यात काही उद्योग आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

पाणीपुरवठा योजना, रस्ते विकास, आरोग्यसेवा, शेतकऱ्यांसाठी फार्मर प्रोड्युसर कंपन्या, आयुष्मान कार्ड व मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ गरजू नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम भाजपचे उमेदवार निवडून आल्यानंतर विशेष लक्ष दिले जाईल, असा दावा त्यांनी केला.

दरम्यान, भावनिक मुद्द्यांना बळी न पडता विकासाला मतदान करा. ज्यांनी तुमच्यासाठी काम केले, त्यांना साथ द्या, असे आवाहन करत चित्तरंजन गायकवाड यांनी जनतेने भाजपच्या उमेदवारांना कौल द्यावा, अशी साद घातली.

## लोणी काळभोर–कदमवाकवस्ती–वडकी गटात घड्याळचाच गजर होणार

### माजी सरपंच वंदना काळभोर यांचा ठाम विश्वास

**लोणी काळभोर, ता. २ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर - कदम वाकवस्ती-वडकी गटात राष्ट्रवादी काँग्रेसने प्रचारात आघाडी घेतल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर राष्ट्रवादीच्या वतीने घरोघरी जाऊन नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या जात असून, या प्रचार करत असताना गावागावातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या सकारात्मक वातावरणामुळे या गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे तीनही उमेदवार दणदणीत विजय मिळवणार आहेत. असा ठाम विश्वास लोणी काळभोरच्या माजी सरपंच वंदना काळभोर यांनी व्यक्त केला आहे.

वडकी (ता. हवेली) येथे झालेल्या गावभेटी दरम्यान बोलताना वंदना काळभोर यांनी वरील विश्वास व्यक्त केला. या गावभेटीप्रसंगी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, लोणी काळभोरचे सरपंच नागेश काळभोर, माजी सरपंच भोलेनाथ उर्फ चंदर शेलार, माजी उपसरपंच आण्णासाहेब काळभोर, राजेंद्र काळभोर, प्रताप बोरकर, रमेश भोसले, युवराज काळभोर, सुजित कांबळे, सुर्यकांत काळभोर यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत असून, प्रचारात चैतन्याचे वातावरण आहे.




वंदना काळभोर पुढे म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस हा केवळ आश्वासने देणारा पक्ष नसून प्रत्यक्ष काम करणारा पक्ष आहे. त्यामुळे मतदारांनी यावेळीही विकासालाच कौल दिला आहे. महिला सक्षमीकरणासाठी राबविलेल्या योजना, शेतकऱ्यांसाठी केलेली कामे, युवकांसाठी रोजगारनिर्मितीचे उपक्रम आजही जनतेच्या लक्षात असल्याचे त्यांनी नमूद केले. लोणी काळभोर कदम वाकवस्तीवडकी जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादीकडून शीतल सुजित कांबळे, लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातून रेश्मा युवराज काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून अमोल टेकाळे हे अधिकृत उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. सध्या या तिन्ही उमेदवारांचा प्रचार वेगाने सुरू असून, घराघरांत जाऊन थेट जनतेशी संवाद साधला जात आहे. महिला, युवक, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांकडून घड्याळ या निवडणूक चिन्हाला मोठा पाठिंबा मिळत असल्याचे स्पष्ट होत आहे. काही पक्ष केवळ निवडणुकीच्या तोंडावर मतदारांना भूलथापा देण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र या भागातील जनता आता जागरूक झाली असून, कोण काम करतो आणि कोण फक्त भाषणबाजी करतो हे मतदार चांगलेच ओळखून आहेत, अशी टीका करत वंदना काळभोर यांनी विरोधकांचे सर्व डावपेच अपयशी ठरणार असल्याचा दावा केला.

## कोविड काळातील ठोस कामगिरीमुळे सुरज चौधरी यांचा विजय निश्चित

### माजी सरपंच राजेंद्र चौधरी यांचा ठाम विश्वास

**उरुळी कांचन, ता. २ :** कोविड-१९ च्या भीषण संकटात पेठचे माजी सरपंच सुरज चौधरी यांनी मात्र थेट मैदानात उतरून जनतेसाठी काम केले. याच ठोस आणि भरीव कार्यामुळे आगामी पंचायत समिती निवडणुकीत कोरेगाव मूळ गणातून सुरज चौधरी यांचा विजय निश्चित असल्याचे ठाम मत नायगावचे माजी प्रभारी सरपंच राजेंद्र चौधरी यांनी व्यक्त केले. नायगाव (ता. हवेली) येथे 'पुणे प्राईम न्यूज'शी बोलत असताना चौधरी यांनी आपले मत व्यक्त केले आहे. यापुढे बोलताना राजेंद्र चौधरी म्हणाले की, कोविड काळात गोरगरीब कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडले होते. रोजगार बंद, उत्पन्न शून्य आणि अन्नधान्याची टंचाई असताना अनेक जण मदतीच्या प्रतीक्षेत होते. अशा कठीण परिस्थितीत सुरज चौधरी यांनी कोणताही राजकीय गाजावाजा न करता शेकडो गरजू कुटुंबांना अन्नधान्य किटचे



वाटप केले. तांदूळ, डाळ, तेल, साखर यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या माध्यमातून त्यांनी जनतेच्या पोटाला आधार दिला. हे काम म्हणजे केवळ मदत नव्हे, तर संवेदनशील नेतृत्वाचे जिवंत उदाहरण आहे. कोविडनंतर शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेली गंभीर परिस्थितीही सुरज चौधरी यांच्या नजरेतून सुटली नाही. अनेक गरीब पालकांना मुलांच्या शिक्षणासाठी लागणारे साहित्य खरेदी करणे अशक्य झाले होते. ही परिस्थिती ओळखून त्यांनी परिसरातील शाळांमधील गोरगरीब विद्यार्थ्यांना वह्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. हा उपक्रम आजही सातत्याने सुरू असून, त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबण्यापासून वाचले आहे.

सुरज चौधरी यांचे नेतृत्व हे केवळ मदत वाटपापुरते मर्यादित नसून, ते जनतेच्या अडचणी थेट ऐकून घेणारे, पाठपुरावा करणारे आणि काम पूर्ण होईपर्यंत थांबणारे आहे. त्यामुळेच आज जनतेत त्यांची ओळख केवळ कार्यकर्ता म्हणून नाही, तर उद्याचा सक्षम आणि प्रभावी लोकप्रतिनिधी म्हणून होत आहे.

परिसरातील नागरिक, युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये सुरज चौधरी यांच्याबाबत प्रचंड सकारात्मक वातावरण असून, बोलघेवडे नेते नव्हे, तर काम करणारे नेतृत्व अशी ठाम भूमिका मतदार घेताना दिसत आहे. कोविड काळातील ठोस सामाजिक कार्य, शिक्षणासाठी घेतलेला पुढाकार आणि सातत्यपूर्ण जनसंपर्क यामुळे पंचायत समिती निवडणुकीत सुरज चौधरी यांचे पारडे जड असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. दरम्यान, हवेलीतील प्रस्थापित ज्येष्ठ नेत्यांना या निवडणुकीत तरुण नवीन कार्यकर्त्यांनी आव्हान दिले असून जिल्हाध्यक्ष प्रदीप दादा कंद यांच्या नेतृत्वाखाली केसनंद गटातील तीनही उमेदवार निवडूनच येतील याची खात्री आहे. भाजपच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार जोरात सुरू असून, वाढती गर्दी व नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता सध्या संपूर्ण गट व गण परिसरात भाजपचेच वारे वाहत असल्याचे चौधरी यांनी स्पष्ट केले.

## उरुळी कांचन येथील रेल्वे रुळावर आढळला १९ वर्षीय युवकाचा मृतदेह

**उरुळी कांचन, (पुणे), ता. २ :** उरुळी कांचन परिसरातील रेल्वे रुळावर एका १९ वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. उरुळी कांचन गावाच्या हद्दीतील जक्ए पोल क्रमांक २१९/१ ते २ दरम्यान, तारांगण नक्षत्र बी बिल्डिंगच्या पाठीमागील बाजूस रेल्वे पटरीजवळ सोमवारी (ता. ०२) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

दिनेश संजय कोरडे (वय-१९, तळवाडी चौक, उरुळी कांचन, ता. हवेली) असे मृतदेह सापडलेल्या युवकाचे नाव आहे. याप्रकरणी लोणी काळभोर येथील रेल्वे पोलीस हवालदार राजेंद्र नारायण कांबळे यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी ८ ते दुपारी ४



या वेळेत ड्युटीवर असलेले लोणी काळभोर येथील रेल्वे पोलीस हवालदार राजेंद्र कांबळे यांना जितेंद्र मलक्केकर यांनी रेल्वे रुळावर मृतदेह पडल्याची माहिती दिली. त्यानंतर कांबळे यांनी सकाळी सुमारे ९ वाजता घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, अल्ट्राटेक सिमेंट रेल्वे पटरीजवळ एका तरुणाचा मृतदेह आढळून आला.

या युवकाचे मुंडके धडापासून पूर्णतः वेगळे होऊन रेल्वे पटरीवर पडले होते, तर उर्वरित धड रेल्वे रुळाच्या दक्षिण बाजूस आढळून आले. प्राथमिक तपासात मृत युवकाचे नाव दिनेश कोरडे (वय १९ वर्षे ११ महिने) असे असल्याची माहिती मिळाली. घटनास्थळी कस्तुरी रुग्णवाहिका तात्काळ बोलावून चालक संतोष झोंबडे, माऊली लाड, रतन चव्हाण, व उरुळी कांचन पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांच्या व स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्र, उरुळी कांचन येथे नेण्यात आला. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी युवकाचा जागीच मृत्यू झाल्याचे घोषित केले.

दरम्यान, सदर घटना सकाळी ९ वाजण्यापूर्वी घडल्याचा अंदाज असून, रेल्वे अपघात, आत्महत्या अथवा अन्य कारणांबाबत उरुळी कांचन पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## लोणी काळभोर गटात विजयाचा मार्ग सुखर : माजी सरपंच राजाराम काळभोर यांचा ठाम विश्वास

**लोणी काळभोर, ता. २ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीत लोणी काळभोर गटात भारतीय जनता पक्षाने आघाडी घेतली असून, मतदारांचा वाढता प्रतिसाद पाहता भाजपच्या विजयाचा मार्ग पूर्णतः सुखर झाला आहे. असा ठाम विश्वास लोणी काळभोरचे माजी सरपंच राजाराम काळभोर यांनी व्यक्त केला आहे. जनतेचा कौल स्पष्ट असून, विकासाच्या मुद्द्यावर भाजपच पुढे आहे, असा ठाम दावा त्यांनी केला.

दौंड तालुक्याचे कार्यसम्राट आमदार राहुल कुल आणि भाजप (उत्तर) जिल्हाध्यक्ष व जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद यांनी लोणी काळभोरसह संपूर्ण परिसरात भरीव आणि लोकाभिमुख विकासकामे करून ग्रामीण भागाचा कायापालट केला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण, आरोग्य व विविध मूलभूत सुविधांच्या माध्यमातून फडणवीस सरकारच्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात भाजप यशस्वी ठरली आहे. हाच विकास आज भाजपचा सर्वात मोठा प्रचारक ठरत असल्याचे चित्र आहे.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील रायवाडी परिसरात भाजपच्या प्रचाराचा धुमधडाका सोमवारी (ता. २) सुरू होता. घराघरांत जाऊन मतदारराजाशी थेट संवाद साधण्यात आला. प्रचारादरम्यान बोलताना माजी सरपंच राजाराम



काळभोर म्हणाले की, मतदारांचा कल स्पष्टपणे भाजपकडे झुकलेला असून, विरोधकांकडे सांगण्यासारखे काहीच उरलेले नाही. विकासाची कामे बोलकी आहेत.

यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती सनी उर्फ युगंधर काळभोर, माजी सरपंच भरत काळभोर, माधुरी काळभोर, माजी उपसरपंच ज्योती अमित काळभोर, किरण शिवदास काळभोर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसरात भाजपच येणार अशा घोषणा ऐकूयेत होत्या.

पुढे बोलताना राजाराम काळभोर यांनी भाजपच्या अधिकृत उमेदवारांची माहिती देत सांगितले की, लोणी काळभोर जिल्हा परिषद गटातून पूनम बाबुराव गायकवाड, लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातून श्वेता कमलेश काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून ज्ञानेश्वर नामुगाडे हे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तिन्ही उमेदवार स्वच्छ प्रतिमा, कामाची जाण आणि जनतेशी नाळ जोडलेली असलेले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत भाजपचा दणदणीत विजय निश्चित आहे, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, लोणी काळभोर-कदमवाकवस्ती पंचायत समिती गणात भाजपच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड व गौरी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरू आहे. नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद आणि वाढती गर्दी पाहता सध्या लोणी काळभोर परिसरात भाजपचेच वारे वाहत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# पिंपरी चिंचवड महापालिकेत नवी महायुती; कट्टर संघर्ष विसरून महेश लांडगे

## अजितदादांचा गट आता एकाच सत्तेच्या खुर्चीवर?

**पिंपरी चिंचवड, ता. २ :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सत्तासमीकरणांबाबत मोठे संकेत मिळाले असून, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र सत्तेत बसण्याची शक्यता उघडपणे पुढे आली आहे. भाजपचे गटनेते प्रशांत शितोळे यांनी राष्ट्रवादीला सोबत घेण्याबाबत सकारात्मक भूमिका जाहीर केल्याने शहराच्या राजकारणात नवी दिशा स्पष्ट होत आहे. सध्याच्या घडामोडी पाहता, पिंपरी चिंचवडमध्ये भाजपसमोर प्रभावी विरोधक उरणार नाहीत, असे चित्र तयार झाले आहे.

महापौरपदासाठी भाजपकडून रवी लांडगे यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली असून त्यांनी अर्जही दाखल केला आहे. मात्र उपमहापौरपदासाठी भाजपकडून चर्चेत



असलेल्या शीतल शिंदे यांनी ऐनवेळी पद स्वीकारण्यास नकार दिल्याने भाजप नेत्यांना उमेदवार बदलण्याची वेळ आली. अखेर भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविका शर्मिला बाबर यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केला. या घडामोडींमुळे भाजपमध्येही अंतर्गत गणिते बदलताना दिसली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुरुवातीला दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली म्हणून महापौरपदाची निवडणूक लढवली जाणार नसल्याचे सांगण्यात आले होते. मात्र त्यानंतर अचानक राष्ट्रवादीकडून वैशाली काळभोर यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले. यामुळे भाजप आणि राष्ट्रवादी एकत्र सत्तेत सहभागी होणार का, हा प्रश्न ऐरणीवर आला.

याबाबत विचारले असता प्रशांत शितोळे यांनी स्पष्टपणे सांगितले की, शहराचा एकत्रित आणि वेगवान विकास साधण्यासाठी राष्ट्रवादीला सोबत घेण्यास भाजप तयार आहे. तसेच अजित पवार यांच्यावरील धार्मिक विधी अद्याप पूर्ण न झाल्याने, शिष्टाचार पाळत कोणताही जल्लोष किंवा सत्तारोहणाचा आनंद साजरा केला जाणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

महत्त्वाचे म्हणजे, मागील महापालिका निवडणुकीत भाजप आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात तीव्र संघर्ष पाहायला मिळाला होता. अजित पवार आणि भाजप आमदार महेश लांडगे यांच्यातील वाकयुद्ध राज्यभर चर्चेचा विषय ठरले होते. अखेर त्या संघर्षात महेश लांडगे यांची सरशी झाली. आता अजित पवार यांच्या निधनानंतर पुन्हा संघर्ष नको, स्थैर्य आणि विकासाला प्राधान्य द्यावे, या भूमिकेतून दोन्ही पक्ष महापालिकेत एकत्र सत्तेत बसण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## दारूच्या नशेत कार चालकाने माजवला हाहाकार

**सांगली, ता. २ :** रविवारी महाराष्ट्रातील सांगली शहरात एक धक्कादायक घटना घडली. गणपती मंदिराजवळील टिळक रोड परिसरात एका एसयूव्ही वाहनाने अचानक नियंत्रण सुटल्याने रस्त्यावर उभ्या असलेल्या आणि चालू असलेल्या अनेक वाहनांना धडक दिली. त्यानंतर हे वाहन थेट गर्दीत घुसल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. या घटनेत पाच पोलिसांसह एकूण ११ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णामाई उत्सवानिमित्त अनेक नागरिक रस्त्यावरून पायी जात असताना ही घटना घडली.

एसयूव्ही चालकाने प्रथम दुचाकी आणि चारचाकी वाहनांना धडक दिली. त्यानंतर वेग न कमी करता तो थेट लोकांच्या गर्दीत शिरला.

त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि लोकांनी पळापळ सुरू केली.

## संक्षिप्त

### पुण्यात अल्पवयीन मुलीची बदनामी केल्याप्रकरणी ६५ वर्षीय वृद्धावर गुन्हा

**पुणे, ता. २ :** पुणे शहरात एका ६५ वर्षीय वृद्धाने अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिची बदनामी केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. आंबेगाव पोलिसांनी या प्रकरणी सतीश पांडुरंग खोंड (रा. दत्तनगर) याच्यावर गुन्हा दाखल केला असून, या घटनेमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. दत्तनगर परिसरातील एका १७ वर्षीय मुलीला आरोपी सतीश खोंड कॉलेजला सोडण्याच्या बहाण्याने ओळख वाढवत होता. ऑगस्ट २०२५ पासून हा त्रास सुरू होता. आरोपी केवळ तिचा पाठलाग करून थांबला नाही, तर तिला पैसे देण्याचे आमिष दाखवून मैत्री करण्यासाठी दबाव टाकूलागला. मुलगी कुठे जाते, कोणाला भेटते, यावरही तो पाळत ठेवत होता. या नराधमाच्या वागण्याला कंटाळून मुलीने अखेर हा प्रकार आपल्या घरी सांगितला. मुलीने घरी तक्रार केल्याचा राग मनात धरून या वृद्धाने अत्यंत नीच कृत्य केले. त्याने एका मोठ्या कागदावर हाताने मुलीबद्दल बदनामीकारक मजकूर लिहिला आणि त्याचे पोस्टर तयार करून त्यांच्या राहत्या परिसरात लावले. ३१ जानेवारी रोजी जेव्हा हे पोस्टर लोकांच्या नजरेस पडले, तेव्हा पीडित मुलीने आणि तिच्या कुटुंबीयांनी तत्काळ आंबेगाव पोलीस ठाण्यात धाव घेतली.

### अपघातात पत्नीचा मृत्यू; पतीवर गुन्हा दाखल

**पुणे, ता. २ :** पुण्यातील उत्तमनगर परिसरात एक अशी दुर्दैवी घटना घडली आपतीसोबत दुचाकीवर सुरक्षित घरी पोहोचणार तेवढ्यात ३७ वर्षीय महिलेचा रस्त्यातच करुण अंत झाला. मात्र, हा केवळ अपघात नसून चूक असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. याच कारणास्तव, पत्नीच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी पतीविरुद्धच गुन्हा दाखल केला आहे. शर्ली एन. अन्थोनी (रा. उत्तमनगर) या आपल्या पतीसोबत दुचाकीवरून एनडीए रस्त्यावरील भाजी मंडई चौकातून जात होत्या. भाजी खरेदी करून घरी परतताना अचानक दुचाकी घसरली. हा अपघात इतका भीषण होता की, शर्ली यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या शर्ली यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, पण त्यांचा मृत्यू झाला होता. अपघात झाला असे म्हणून आपण सोडून देतो. मात्र, उत्तमनगर पोलिसांनी या घटनेचा बारकाईने तपास केला असता, भरधाव वेगामुळेच पतीचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. रहदारीच्या रस्त्यावर सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याने हा जीवघेणा अपघात झाला.अनेकदा आपण वेग मर्यादा ओलांडतो. या घटनेत डोक्याला झालेली दुखापत जीवघेणी ठरली.



# बेकायदा पार्किंगवर कडक कारवाई; थेट FIR दाखल होणार

**मुंबई, ता. २ :** मुंबईत आग लागणे, इमारत कोसळणे किंवा कोणतीही मोठी आपत्ती घडली, की सर्वात मोठी अडचण समोर येते ती अरुंद रस्ते आणि बेकायदा पार्किंगची. अनेक वेळा अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी वेळेत पोहोचू शकत नाहीत. काही मिनिटांचा उशीरही जीवघेणा ठरतो. याच गंभीर वास्तवाची दखल घेत बृहन्मुंबई महानगरपालिकेने आता कठोर निर्णय घेतला आहे.

आता आपत्तीच्या वेळी अग्निशमन दलाच्या कामात अडथळा ठरणाऱ्या बेकायदा पार्क केलेल्या वाहनांवर थेट गुन्हा दाखल केला जाणार आहे. महापालिका आयुक्त व प्रशासक भूषण गगराणी यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले असून पालिकेने अधिकृत आदेश जारी केला आहे. मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरात हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. अनेक भागांमध्ये रस्त्यांच्या दुतर्फा वाहने उभी केल्यामुळे फायर ब्रिगेडच्या मोठ्या, सुसज्ज गाड्यांना वळणे घेणे किंवा आत शिरणे अशक्य होते. परिणामी आग पसरणे, लोक अडकणे आणि मोठी वित्तहानी होण्याचे प्रकार घडले आहेत. यापुढे अशा निष्काळजीपणाकडे प्रशासन दुर्लक्ष करणार नाही.

नव्या नियमानुसार, अग्निशमन कार्य पूर्ण झाल्यानंतर अडथळा ठरलेल्या वाहनाचे छायाचित्र काढले जाईल, नोंदणी क्रमांक नोंदवला जाईल आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने संबंधित पोलीस ठाण्यात वाहनमालकाविरोधात एफआयआर दाखल केली जाईल. विशेषम्हणजे, जर त्या अडथळ्यामुळे मोठी जीवितहानी किंवा आर्थिक नुकसान झाले असेल, तर कारवाई अधिक गंभीर स्वरूपाची असू शकते. प्रमुख अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर यांनी सांगितले की, सामान्य नागरिकांनीही अशा बेकायदा पार्किंगबाबत तक्रार केल्यास ती पोलीस आणि वाहतूक विभागाकडे पाठवली जाईल. हा निर्णय दंड किंवा कारवाईपुरता मर्यादित नाही, तर नागरिकांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी आहे.

आपत्तीच्या क्षणी प्रत्येक सेकंद अमूल्य असतो. चुकीच्या ठिकाणी उभ्या केलेल्या एका वाहनामुळे एखाद्याचा जीव जाऊ नये, हाच या निर्णयामागचा खरा उद्देश आहे. त्यामुळे मुंबईकरांनी वाहन पार्क करताना आपत्कालीन सेवांसाठी मार्ग मोकळा राहतोय ना? हा प्रश्न स्वतः ला विचारणे आता अत्यावश्यक ठरणार आहे.

# अजितदादांच्या अंत्यसंस्कारावेळी गर्दीचा फायदा घेत २० लाखांच्या दागिन्यांची चोरी

## बारामती पोलिसांनी आंतरजिल्हा टोळीच्या आवळल्या मुसक्या

**पुणे, ता. २ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर बारामतीत झालेल्या अंत्यसंस्कारावेळी शोकाकुल वातावरणाचा गैरफायदा घेत चोरट्यांनी मोठ्या प्रमाणावर चोरी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. २८ तारखेला झालेल्या विमान अपघातानंतर २९ तारखेला बारामतीत अंत्यसंस्कार पार पडले. या वेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नेते, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रचंड गर्दीत काही अज्ञात चोरट्यांनी महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या आणि नागरिकांकडील रोख रक्कम लंपास केल्याचे तपासात समोर आले आहे.



प्राथमिक तपासानुसार, वेगवेगळ्या नागरिकांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या आणि रोख रक्कम असा एकूण अंदाजे २० लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात रणजीत बाळासाहेब जाधव यांच्यासह विश्वजीत तुपे, अंकुश दिघे, प्रशांत सपकाळ, विकास भागवत, रणजीत भोंगळे आणि इतर अनेक नागरिक बळी ठरल्याचे समोर आले आहे. दुःखाच्या प्रसंगी अशी घटना घडल्याने नागरिकांमध्ये संताप आणि अस्वस्थता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच बारामती तालुका पोलिसांनी तपासाला वेग दिला. तांत्रिक माहिती आणि गुप्त सूत्रांच्या आधारे केलेल्या तपासात विविध जिल्ह्यांतून आलेल्या टोळीचा सहभाग उघड झाला. या प्रकरणी बीड, यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या आरोपींकडून चोरीस गेलेला सोन्याचा मुद्देमाल आणि रोख रक्कम हस्तगत करण्याचे प्रयत्न सुरू असून, त्यांची कसून चौकशी केली जात आहे.

# मुंबई-पुणे प्रवास आता होणार सुपरफास्ट

**पुणे, ता. २ :** पुणे आणि मुंबई प्रवास आता 'हाय-स्पीड' गतीने होणार आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात सात नवीन अतिजलदरेल्वे प्रकल्पांची घोषणा करण्यात आली असून, यामध्ये पुणेकरांसाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद या दोन मार्गांचा समावेश करण्यात आला आहे. देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे यश आणि त्यातून मिळालेला तांत्रिक अनुभव लक्षात घेऊन केंद्र सरकारने आता देशाच्या इतर भागांत हाय-स्पीड ट्रेन सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केलेल्या या सात नवीन कॉरिडॉरमध्ये पुण्याला केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे.

सध्या पुणे-मुंबई प्रवासाला रेल्वेने ३ ते ४ तास लागतात. हाय-



स्पीड ट्रेनमुळे हे अंतर अवघ्या ९० मिनिटांच्या आत कापले जाण्याची शक्यता आहे. विमानाचा प्रवास, तिथली सुरक्षा तपासणी आणि विमानतळावर जाण्याचा वेळ पाहता, शहराच्या मध्यवर्ती भागातून सुटणारी हाय-स्पीड ट्रेन हा अधिक सोयीस्कर आणि स्वस्त पर्याय ठरेल.

हैदराबाद ते बंगळुरू, चेन्नई ते बंगळुरू आणि वाराणसी ते सिलीगुडी यांसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांमुळे पुण्याहून दक्षिण आणि उत्तर भारतात जाणे अधिक सोपे होणार आहे.

# सुनेत्रा पवारांनी तातडीने शपथ घेऊन नक्की कुणाचा डाव उधळला?

**पुणे, ता. २ :** अजित पवारांच्या अनपेक्षित जाण्याने बारामतीसह संपूर्ण महाराष्ट्र सुन्न आहे. मात्र, या दुःखाच्या सावटाखाली राजकारणात अशा काही हालचाली घडल्या, ज्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, त्यावरून उलटसुलट चर्चांना उधाण आलं होतं. आता याच मुद्द्यावर बसपाचे प्रदेश महासचिव काळुराम चौधरी यांनी एक असा दावा केला आहे, ज्यामुळे पवारांच्या कुटुंबातील अंतर्गत संघर्षाचे पडसाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत.

चौधरांच्या मते, सुनेत्रा पवारांचा शपथविधी हा केवळ सत्ताप्राप्तीचा प्रयत्न नव्हता, तर ते एक 'डॅमेज कंट्रोल' होतं. जर वहिनींनी तातडीने पद स्वीकारलं



नसतं, तर त्यांना आणि त्यांच्या दोन्ही मुलांना, कुटुंबाने आणि राजकारणाने वाळीत टाकलं असतं, असा खळबळजनक आरोप त्यांनी केला आहे. अजितदादांच्या निधनानंतर सुनेत्रा वहिनींना 'बाहेर' काढण्याच्या हालचाली खुद्द पवार घराण्यातूनच सुरू झाल्या होत्या, असा त्यांचा रोख आहे. शरद पवार साहेब नेहमीच राजकारण करतात, त्यांच्या बोलण्यातून आणि वागण्यातून ते दिसून येत, अशा कडक शब्दांत त्यांनी टीका केली.

अजित पवार यांच्या निधनानंतरही शरद पवार याचं वागण योग्य नव्हत, सोनगावला अस्थी सावडलं आणि एक तासानंतर साहेब (शरद पवार) नीरा नदीवर गेले? नदीच प्रदूषण त्यांना त्याच वेळी कसं सुचलं? असे अनेक प्रश्न काळुराम चौधरी यांनी उपस्थित केले आहे.

नेहमीच अजितदादांना धारेवर धरणारे चौधरी आज त्यांच्या कुटुंबाच्या बचावासाठी पुढे आले आहेत. त्यांनी शरद पवारांच्या कृतीवर शंका उपस्थित केली आहे. दरम्यान, पुढे काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चितेची आग शांत होण्यापूर्वीच सत्तेचा खेळ; राष्ट्रवादीच विलीनीकरण हवं होतं

**मुंबई, ता. २ :** महाराष्ट्राचे राजकारण सध्या एका अत्यंत संवेदनशील आणि वादळी वळणावर आहे. अजित पवार यांच्या निधनाच्या धक्क्यातून महाराष्ट्र सावरत असतानाच, सुनेत्रा पवार यांचा झालेला शपथविधी राज्याच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फोडून गेला आहे. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'च्या अग्रलेखातून या संपूर्ण घडामोडींवर अत्यंत कडक शब्दांत ताशेरे ओढण्यात आले असून, यामागे भाजपचा 'शत-प्रतिशत' अजेंडा असल्याचा खळबळजनक दावा करण्यात आला आहे.

अग्रलेखातील सर्वात महत्त्वाचा खुलासा म्हणजे दोन राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची प्रक्रिया आहे. अजित पवार यांना शरद पवारांविषयी असलेल्या



आदरामुळे दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याच्या हालचाली सुरू होत्या. जिल्हा परिषद निवडणुकांनंतर यावर शिक्कामोर्तब होणार होते, पण नियतीने डाव उलटा फिरवला आणि अजित पवारच निघून गेले. आता हे विलीनीकरण रोखण्यात प्रफुल पटेल, सुनील तटकरे आणि भाजपचे सर्वोच्च नेतृत्व यांचाच स्वार्थ असल्याचा आरोप अग्रलेखात केला आहे.

सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपद मिळणे, हा कर्तृत्वाचा भाग नसून राजकीय सोयीचा भाग असल्याचे 'सामना'ने म्हटले आहे. अजित पवारांनंतर पक्षात निर्माण झालेली पोकळी आणि प्रफुल पटेल-सुनील तटकरे यांच्यातील अंतर्गत वाद मिटवण्यासाठी सुनेत्रा वहिनींना उपमुख्यमंत्रीपद दिले. मात्र, या सत्तेच्या नौकेला देवेंद्र फडणवीस यांचे इंजिन असून त्याचा रिमोटही त्यांच्याच हातात आहे, असा टोला लगावण्यात आला आहे.

अजित पवारांच्या जाण्याने पवार कुटुंबातील आणि पर्यायाने राज्याच्या राजकारणातील गुंता अधिक वाढला आहे. हा गुंता सुटू नये, यातच अनेकांचे राजकीय हितसंबंध दडले आहेत. सुनेत्रा पवार यांनी जर स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले, तर पक्षात त्यांना घरच्यांकडूनच (पटेल, तटकरे, भुजबळ) विरोधाचा सामना करावा लागेल, असा इशाराही या अग्रलेखातून देण्यात आला आहे.

# विवाहित महिलेला फोन करुन त्रास देणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल

**पुणे, ता. २ :** पुणे शहरात गेल्या काही महिन्यांपासून सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर वाढल्याने सुरक्षित मानल्या जाणाऱ्या माध्यमांचाही गैरवापर होत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. अशाच एका धक्कादायक घटनेत पुण्यातील येवलेवाडी परिसरात एका विवाहित महिलेला व्हॉट्सअॅप कॉलद्वारे त्रास देणाऱ्या तरुणाविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, येवलेवाडी येथे राहणाऱ्या ३३ वर्षीय विवाहित महिलेला एका तरुणाकडून वारंवार व्हॉट्सअॅप कॉल येत होते. आरोपी कॉल करून महिलेला त्रास देत होता. मला तुझ्याशी लग्न करायचे आहे, तू तुझ्या पतीला आणि मुलांना सोडून माझ्याकडे ये, अशी मागणी करत तो तिच्यावर दबाव टाकत होता.





या सततच्या त्रासामुळे महिलेला मानसिक तणावाला सामोरे जावे लागले.

हा प्रकार २८ जानेवारी रोजी घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. आरोपीने वारंवार फोन करून महिलेच्या खासगी आयुष्यात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. अवाजवी बोलणे, सतत कॉल करणे आणि चुकीच्या मागण्या केल्यामुळे महिलेला भीती वाटू लागली होती. अखेर कंटाळून आणि मानसिक त्रास सहन न झाल्याने पीडित महिलेने येवलेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


महिलेच्या तक्रारीवरून सोन रूपचंदानी नावाच्या तरुणाविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने व्हॉट्सअॅप कॉलचा वापर करून महिलेला त्रास दिला असून तिच्या कुटुंबापासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला आहे.

या घटनेची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेतली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सध्या प्रकरणाचा तपास सुरू असून आरोपीने यापूर्वी इतर कोणाला अशाच प्रकारे त्रास दिला आहे का, याचीही चौकशी केली जात आहे. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सोशल मीडिया आणि कॉलिंग प्सचा गैरवापर करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

# राष्ट्रवादीच्या नेतृत्वाची सूत्रे नेमकी कोणाकडे? पक्षांतर्गत पत्रामुळे राजकीय चर्चांना वेग!

**पुणे, ता. २ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर अस्थिर झालेल्या महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणात खासदार सुप्रिया सुळे यांच्या एका व्हॉट्सअॅप स्टेटसमुळे नव्याने राजकीय चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन गट पुन्हा एकत्र येणार का, या प्रश्नावर आधीच तर्कवितर्क सुरू असताना, सुप्रिया सुळे यांनी शेअर केलेला हा स्टेटस अनेक अर्थांनी महत्त्वाचा मानला जात आहे.

सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्यासोबतचा जुना फोटो व्हॉट्सअॅप स्टेटसला ठेवला असून त्यावर फक्त बारामती असं कॅप्शन दिलं आहे. शब्द कमी



असले तरी वेळ आणि संदर्भ पाहता या स्टेटसकडे केवळ भावनिक नव्हे, तर राजकीय संकेत म्हणूनही पाहिलं जात आहे. पक्षात फुट पडल्यानंतर सुप्रिया सुळे आणि अजित पवार वेगवेगळ्या राष्ट्रवादी काँग्रेस गटांचे नेतृत्व करत होते. तरीही पवार कुटुंबातील ऐक्य अबाधित असल्याचा दावा दोन्ही बाजूंनी वारंवार केला जात होता.

या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी गटांनी समन्वयाची भूमिका घेतली होती. त्यानंतर दोन्ही पक्षांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांना वेग आला होता. मात्र, अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे ही प्रक्रिया अचानक थांबली आणि पक्षात नेतृत्वाची तसेच राजकीय दिशेची पोकळी निर्माण झाली.

अशा परिस्थितीत सुप्रिया सुळे यांचा बारामती स्टेटस केवळ आठवणी जपणारा नसून, शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतेकडे इशारा देणारा असल्याचं अनेक राजकीय निरीक्षकांचं मत आहे. दुसरीकडे, काही कार्यकर्त्यांच्या मते हा पूर्णपणे भावनिक संदेश असून दिवंगत अजित पवार यांना दिलेली एक शांत श्रद्धांजली आहे.

या स्टेटसचे स्क्रीनशॉट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, समर्थकांपासून राजकीय विश्लेषकांपर्यंत सर्व स्तरांत चर्चा सुरू आहे. सध्या तरी सुप्रिया सुळे किंवा राष्ट्रवादी काँग्रेसकडून कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, अजित पवारांच्या निधनानंतर सुरू झालेल्या विलीनीकरणाच्या चर्चांमध्ये या एका स्टेटसमुळे पुन्हा एकदा राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# अजित पवारांनी धमकीला चोख उत्तर दिलं म्हणून काढला काटा?

## संजय राऊतांच्या दाव्याने खळबळ

**मुंबई, ता. २ :** महाराष्ट्राच्या राजकारणातील कामाचा माणूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजित पवार यांचा विमान अपघातात झालेल्या निधनामुळे अनेकांना धक्का बसला आहे. मात्र, या दुर्दैवी घटनेभोवती आता संशयाचे दाट धुके साचू लागले आहे. शिवसेना नेते संजय राऊत यांनी या मृत्यूमागे 'मोठे कारस्थान' असल्याचे सांगत, या प्रकरणाची तुलना थेट वादग्रस्त 'जस्टिस लोया' प्रकरणाशी केली आहे. राऊतांच्या विधानामुळे महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षात आता 'घातपाता'च्या चर्चेने उग्र रूप धारण केले आहे.

संजय राऊत यांनी या प्रकरणाचा जो घटनाक्रम मांडला आहे, तो अत्यंत गंभीर असून राऊतांच्या दाव्यानुसार: मृत्यूच्या १० दिवस आधी अजित पवारांनी आपण पुन्हा शरद पवारांकडे म्हणजेच 'स्वगृही' परतण्यास इच्छुक



असल्याचे बोलून दाखवले होते.

काही सत्ताधारी नेत्यांनी अजित पवारांना जुन्या 'सिंचन घोटाळ्याच्या' फाईल्स उघडून धमकावल्याचा आरोप राऊतांनी केला आहे. या धमकीला दादांनी चोख प्रत्युत्तर दिले होते. त्यानंतर हा अपघात झाला, हा निव्वळ योगायोग आहे की पूर्वनियोजित कट? असा जळजळीत सवाल राऊतांनी विचारला आहे.

राऊत यांच्या मते, समोर येत असलेली तथ्ये पाहता हा अपघात नसून घातपात असण्याची शक्यता जास्त आहे. ज्या पद्धतीने जस्टिस लोया यांच्या बाबतीत घडले, तसेच काहीसे इथेही दिसतेय का? असे विचारत त्यांनी अनेकांवर न कळत निशाणा साधला आहे. खुद्द अजित पवारांच्या पक्षातील काही नेत्यांनाही आता या मृत्यूबाबत संशय वाटू लागला आहे, ही बाब अधिक चिंताजनक आहे.

# सहा प्रवासी की पाच मृतदेह? अजित पवार अपघातावर अमोल मिटकरींचे आरोप

## उज्ज्वल निकमांनी स्पष्टचं सांगितलं...

**मुंबई, ता. २ :** बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अकाली निधन झाल्याने महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. राज्याच्या राजकारणातील अत्यंत प्रभावी आणि निर्णायक नेतृत्व हरपल्याने कार्यकर्ते, समर्थक आणि राजकीय वर्तुळातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. मात्र या दुर्दैवी घटनेनंतर शोकासोबतच अनेक प्रश्न आणि संशयही पुढे येत आहेत.

अपघातानंतर सुरुवातीला विमानात सहा प्रवासी होते आणि सर्वांचा मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली होती. मात्र घटनास्थळी पाच मृतदेहच सापडल्याचे सांगितले जात असल्याने संशयाला सुरुवात झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानपरिषद



आमदार अमोल मिटकरी यांनी हा मुद्दा उचलून धरत सहावा प्रवासी कोण होता? असा थेट सवाल केला. यामुळे हा अपघात केवळ तांत्रिक कारणांमुळे झाला की यामागे काही वेगळं कारण आहे, यावर चर्चा सुरू झाली.

या पार्श्वभूमीवर भाजपचे राज्यसभा खासदार आणि ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांनी संशयांवर स्पष्ट भूमिका मांडली आहे. निकम यांच्या मते, विमानात सहा प्रवासी होते, हे सिद्ध करणारा कोणताही ठोस पुरावा सध्या उपलब्ध नाही. अपघातग्रस्त विमानात मोठ्या प्रमाणावर इंधन असल्यामुळे मृतदेह अत्यंत जळालेल्या अवस्थेत सापडणे ही दुर्दैवी पण तांत्रिकदृष्ट्या शक्य बाब असल्याचं त्यांनी सांगितलं. विनाकारण संशय निर्माण करून या घटनेला वेगळी कलाटणी देण्याचा प्रयत्न होतो आहे, असा इशाराही त्यांनी दिला. कटाचा आरोप करायचा असेल तर त्यासाठी किमान प्राथमिक पुरावे आवश्यक असतात आणि ते अद्याप समोर आलेले नाहीत, असंही निकम यांनी स्पष्ट केलं.

दुसरीकडे, अमोल मिटकरी यांनी सोशल मीडियावर व्यक्त केलेल्या भावनिक आणि आक्रमक प्रतिक्रियेमुळे वातावरण अधिक तापलं आहे. दादा असे सहज जाऊ शकत नाहीत, असा दावा करत त्यांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे.

हे प्रकरण महत्त्वाचे ठरण्याचं कारण म्हणजे, अजित पवार हे सत्तास्थापनेत आणि राज्याच्या राजकारणात मध्यवर्ती भूमिका बजावत होते. त्यांच्या निधनानंतर केवळ राजकीय समीकरणेच बदलणार नाहीत, तर या अपघाताभोवती फिरणाऱ्या संशयांमुळे सरकारची विश्वासार्हता आणि तपास यंत्रणांची भूमिका यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यामुळे या घटनेवर पारदर्शक आणि विश्वासार्ह तपास होणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# बीड जिल्ह्यात ७० वर्षांच्या नराधमाने केला शाळेला जाणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**बीड, ता. २ :** बीड जिल्ह्यामध्ये माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. माजलगाव तालुक्यातील एका गावामध्ये एका ७० वर्षांच्या वृद्धाने चौथीत शिकणाऱ्या एका लहान मुलीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली असून पोलिसांनी आरोपीला तातडीने बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ही धारूर तालुक्यातील एका शेतमजूर कुटुंबातील आहे. २८ जानेवारी रोजी सकाळी ती नेहमीप्रमाणे शाळेत जाण्यासाठी घराबाहेर पडली होती. वाटेत ती आपल्या एका मैत्रिणीची वाट पाहत



थांबली असताना, गावातीलच बाबुराव केरबा निरडे या ७० वर्षीय व्यक्तीने तिला गाठले. त्याने मुलीला चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून आपल्या घरात बोलावले. मुलगी घरात गेल्यावर त्याने दरवाजा आतून बंद केला आणि तिच्यावर अत्याचार केला. या घटनेनंतर घाबरलेली मुलगी तशीच शाळेत गेली. दिवसभर तिने कोणालाही काही सांगितले नाही, पण ती मनातून खूप हादरली होती.

संध्याकाळी जेव्हा मुलगी घरी परतली, तेव्हा तिच्या वागण्यात घरच्यांना मोठा बदल जाणवला. ती खूप शांत होती आणि तिच्या चेहऱ्यावर भीती दिसत होती. तिच्या आईला काहीतरी अघटित घडल्याची शंका आली. आईने तिला प्रेमाने जवळ घेतले आणि विश्वासात घेऊन विचारपूस केली. तेव्हा मुलीने रडत रडत आपल्यासोबत घडलेला सर्व प्रकार सांगितला. हे ऐकून तिच्या कुटुंबाला मोठा धक्का बसला. पीडितेच्या आईने कोणताही उशीर न करता थेट दिंद्रुड पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. आरोपी पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी त्याला अंबाजोगाई परिसरातून ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची रवानगी बीड येथील जिल्हा कारागृहात केली आहे. या घटनेने लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पालक आणि नागरिकांनी सतर्क राहावे आणि आपल्या मुलांशी संवाद साधत राहावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

# जितेंद्र, माझ्यावर विश्वास ठेव! अजितदादा आणि आव्हाडांच्या शेवटच्या भेटीत नेमकं काय घडलं?

**मुंबई, ता. २ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्याच्या राजकारणात केवळ सत्ता-समीकरणेच नव्हे, तर दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या भवितव्याबाबतही वेगाने हालचाली सुरू झाल्या. त्यांच्या निधनानंतर अवघ्या २ ते ३ दिवसांतच दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणावर चर्चा आणि बैठका झाल्याचे दावे समोर येत आहेत. या दाव्यांमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येणार का, हा प्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये विलीनीकरणाबाबत हालचाली सुरू असताना अजित



पवार यांच्यासोबतही काही महत्त्वाच्या बैठकांचा संदर्भ पुढे येत आहे. विशेष म्हणजे, अजित पवार यांना भेटण्याच्या आदल्या दिवशी म्हणजे २२ तारखेला शरद पवार यांच्या सिल्वर ओक निवासस्थानी राष्ट्रवादीच्या नेत्यांची बैठक झाल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर या प्रक्रियेत नेमकँकाय घडलं, याबाबत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जितेंद्र आव्हाड यांनी पहिल्यांदाच स्पष्टपणे भाष्य केले आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा पुढाकार स्वतः अजित पवार यांनी घेतला होता. अजितदादांशी माझं शेवटचं संभाषण झालं होतं. हे मी आतापर्यंत बोललो नव्हतो. या विषयावर मला फार बोलायचं नाही. पण अजितदादा मला म्हणाले होते, जितेंद्र, माझ्यावर विश्वास ठेव, सगळं व्यवस्थित होईल, असे आव्हाड यांनी सांगितले. या वक्तव्यातून विलीनीकरणाच्या चर्चांचा गंभीर टप्पा गाठला होता, याची जाणीव होते. मात्र, सध्या या चर्चांपासून स्वतःला दूर ठेवण्याची भूमिका आव्हाड यांनी घेतली आहे. मला या चर्चेतून लांब राहायचं आहे. थर्ड ग्रेड कॉन्ट्रोव्हर्सीत मला जायचं नाही. तो माणूस गेला आहे, आता त्यावर काय बोलायचं, असे ते म्हणाले. याचवेळी त्यांनी आपली राजकीय निष्ठा स्पष्ट करत, माझा बाप जो निर्णय घेईल, तोच माझा निर्णय असेल. आपलं ते ठरलेलं आहे, असे ठामपणे सांगितले.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## भोपळ्याच्या बिया खाण्याचे आरोग्यवर्धक फायदे, जाणून घ्या

भोपळ्याच्या बिया या पौष्टिकतेचा खजिना आहेत. या लहान बिया आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत. महिनाभर दररोज त्यांचे सेवन केल्याने तुमच्या शरीरावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो. महिनाभर दररोज भोपळ्याच्या बियांचे सेवन केल्याने तुमचे आरोग्य लक्षणीयरीत्या सुधारू शकते. तुम्ही तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवू इच्छित असाल, वजन कमी करू इच्छित असाल तर भोपळ्याच्या बिया खूप फायदेशीर आहेत.

आरोग्यासाठी भोपळ्याच्या बिया खाणे का हितावह : भोपळ्याच्या बियांमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, जे पचनसंस्थेला सुरळीतपणे काम करण्यास मदत करते. नियमित सेवनाने बद्धकोष्ठता दूर होते आणि पोट स्वच्छ राहते. भोपळ्याच्या बियांमध्ये ओमेगा- आणि ओमेगा- फॅटी ॲसिड, मॅग्नेशियम आणि झिंक सारखे पोषक घटक असतात. हे घटक हृदयाच्या आरोग्यासाठी योगदान देतात. ते रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास देखील मदत करतात.

भोपळ्याच्या बियांमध्ये झिंक आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. त्यांचे दररोज सेवन केल्याने सर्दी आणि इतर संसर्ग टाळता येतात.

भोपळ्याच्या बियांमध्ये प्रथिने, निरोगी चरबी आणि खनिजे असतात जी तुम्हाला दिवसभर ऊर्जावान ठेवतात. नाश्त्यात किंवा नाश्त्यात ते खाल्ल्याने थकवा दूर होण्यास मदत होते. भोपळ्याच्या बिया रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करतात. त्यामध्ये असे संयुगे असतात जे इन्सुलिनची पातळी सुधारतात आणि टाइप  मधुमेहाचा धोका कमी करतात. भोपळ्याच्या बियांमध्ये ट्रिप्टोफॅन नावाचे अमिनो आम्ल असते, जे मेलाटोनिन हार्मोन वाढवते. चांगल्या झोपेसाठी हे हार्मोन आवश्यक आहे. जर तुम्हाला झोपेच्या समस्या येत असतील तर दररोज भोपळ्याच्या बिया खायला हव्यात.

## स्वामी चिंचोली येथे सामाईक पाईपलाईनच्या वादातून शेतकऱ्याला बेदम मारहाण

**दौंड, ता. २ :** रानातील सामाईक पाईपलाईन वापरायची नाही असे म्हणून शेजारील शेतकऱ्याला शिवीगाळ दमदाटी करून लाथाबुक्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. सोमवारी (ता. २६) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास स्वामी चिंचोली (ता. दौंड) येथील जमीन गट नं ७२९ मधील शेतात घडली आहे. याप्रकरणी दोघांवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलीप शामराव देसाई व नाना रामदास सस्ते (दोघेही रा. स्वामीचिंचोली, ता. दौंड, जि. पुणे) असे मारहाण करणाऱ्या दोघांची नावे आहेत. तर देवीदास नामदेव नहाणे (वय ५५, व्यवसाय शेती, रा. स्वामीचिंचोली, ता. दौंड, जि. पुणे) असे मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी नहाणे यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# १८८६ पानांच्या आरोपपत्रातून पार्थ पवारांचे नाव गायब

### फक्त शीतल तेजवानीवर ठपका; पुणे जमीन घोटाळ्यात मोठा ट्विस्ट

**पुणे, ता. २ :** पुण्यातील मुंढवा येथील जमीन गैरव्यवहार प्रकरणात अखेर आर्थिक गुन्हे शाखेकडून आरोपपत्र दाखल करण्यात आले असून, या आरोपपत्रामुळे नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणात केवळ शीतल तेजवानी यांचेच नाव आरोपी म्हणून नमूद करण्यात आले असून, सुरुवातीपासून आरोपांच्या भोवऱ्यात असलेले पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांची नावे आरोपपत्रातून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे पार्थ पवार यांना मोठा दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे.



मुंढवा परिसरातील मौल्यवान जमिनीच्या व्यवहारात नियमबाह्य पद्धतीने खरेदी-विक्री, बनावट कागदपत्रे आणि आर्थिक फसवणूक झाल्याचे आरोप यापूर्वी करण्यात आले होते. या प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हे विभागाकडून सुरू होती. तपासानंतर पोलिसांनी तब्बल १८८६ पानांचे विस्तृत आरोपपत्र न्यायालयात सादर केले आहे. मात्र या संपूर्ण दोषारोपपत्रात जबाबदारी केवळ शीतल तेजवानी यांच्यावर निश्चित करण्यात आली असून, इतर कोणत्याही राजकीय व्यक्तीचा थेट उल्लेख करण्यात आलेला नाही.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत महाराष्ट्रात कायदा फक्त सामान्य नागरिकांसाठीच आहे का, असा थेट सवाल उपस्थित केला. या जमीन व्यवहारासंदर्भात दिवाणी न्यायालयात परस्परविरोधी दावे दाखल झाले असताना, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडूनही व्यवहार अवैध ठरवण्याची भूमिका घेण्यात आलेली असताना, मग या प्रकरणात राजकीय जबाबदारी निश्चित का होत नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

दमानिया यांनी हा न्याय नाही, ही न्यायाची थट्टा आहे अशा शब्दांत आरोपपत्रावर टीका केली असून, तपास निवडक पद्धतीने केला जात असल्याचा आरोप केला आहे. एकीकडे आर्थिक गुन्हे शाखेची कारवाई पूर्ण झाली असली तरी दुसरीकडे या प्रकरणातील राजकीय संदर्भ पूर्णपणे बाजूला ठेवले गेल्याचे चित्र समोर येत आहे.

मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरण आता केवळ कायदेशीर न राहता राजकीय विश्वासार्हतेचा मुद्दा बनत चालला आहे. आरोपपत्रामुळे काहींना दिलासा मिळाला असला, तरी तपासाच्या निष्पक्षतेबाबत निर्माण झालेले प्रश्न सहजासहजी शांत होण्याची शक्यता कमी आहे.

## निवडणुकीपूर्वी सोशल मीडिया रीलवर बंदी

**पुणे, ता. २ :** पुणे शहरात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुणे शहर पोलिसांच्या विशेषशाखेने प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. हे आदेश ३ फेब्रुवारीपासून १६ फेब्रुवारीपर्यंत एकूण १४ दिवस लागू राहणार आहेत. ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे आदेश जारी करण्यात आले असून, नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. या आदेशानुसार समाजात तणाव निर्माण होईल, अशी कोणतीही कृती करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. विशेषतः गुन्हेगारी प्रवृत्तीचे गौरव करणारे किंवा अशा व्यक्तींना प्रोत्साहन देणारे सोशल मीडिया रिल्स, व्हिडिओ किंवा पोस्ट शेअर करण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# पाकिस्तानचे तुकडे होणार?; बलुचिस्तानच्या १२ शहरांवर बंडखोरांचा कब्जा

### ३० कैदी फरार अन् भीषण रक्तपात; 'ऑपरेशन हेरॉफ'ने पाकिस्तान हादरलं

**पाकिस्तान, ता. २ :** पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर हिंसाचार उफाळून आला असून, बलोच लिबरेशन आर्मीने ऑपरेशन हेरॉफच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत एकाच वेळी अनेक शहरांमध्ये समन्वयित हल्ले केले आहेत. या हल्ल्यांमध्ये पोलीस ठाणे, सरकारी इमारती आणि सुरक्षा दलांची ठाणी लक्ष्य करण्यात आली. पाकिस्तान सरकारनुसार या संघर्षात १० सुरक्षा जवान मारले गेले असून ५८ दहशतवादी ठार करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, स्वतंत्र स्रोतांकडून या आकड्यांची पुष्टी झालेली नाही.



शनिवारी सकाळी सुमारे ६ वाजता राजधानी क्वेटा येथे झालेल्या जोरदार स्फोटाने या कारवाईची सुरुवात झाली. त्यानंतर जवळपास दोन तास गोळीबार आणि स्फोटांची मालिका सुरू राहिली. क्वेटासह पसनी, मस्तंग, नुश्की आणि ग्वादर जिल्ह्यांमध्येही हल्ल्यांची नोंद झाली आहे. काही ठिकाणी सशस्त्र हल्ले तर काही ठिकाणी आत्मघाती हल्ल्यांचा वापर झाल्याचे सांगितले जात आहे.

स्थानिक पत्रकारांच्या माहितीनुसार, मस्तंगमध्ये बंडखोरांनी पोलीस ठाण्यावर ताबा मिळवत शहरातील नियंत्रण आपल्या हातात घेतले. या गोंधळात ३० हून अधिक कैदी पळून गेल्याची माहिती आहे. क्वेटाच्या काही भागांतही सशस्त्र गटांनी तात्पुरता ताबा मिळवल्याचे सांगितले जाते, तर कलात परिसरात अजूनही चकमकी सुरू आहेत. दरम्यान, द बलुचिस्तान पोस्टच्या वृत्तानुसार इडन्चे कमांडर-इन-चीफ बशीर झेब बलोच यांनी एक व्हिडिओ संदेश जारी करत बलोच जनतेला सशस्त्र संघर्षाच्या निर्णायक टप्प्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

ब्राहुई आणि बलोची भाषेत दिलेल्या संदेशात त्यांनी, आम्ही दहशतवादी नाही. आमच्या भूमीवर कब्जा झाला आहे आणि ही लढाई न्यायासाठी आहे, असे म्हटले. या हल्ल्यांमुळे बलुचिस्तानमधील अस्थिरता अधिक गडद झाली असून, पाकिस्तानच्या अंतर्गत सुरक्षेसमोर गंभीर आव्हान उभे राहिले आहे.

## उन्हाचा चटका वाढला; पण पुण्यात पावसाची शक्यता

**पुणे, ता. २ :** पुणे शहरात आज, २ फेब्रुवारी २०२६ रोजी हवामानात मोठे बदल पाहायला मिळत असून थंडीचा कडाका आता हळूहळू कमी होत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज शहराचे कमाल तापमान ३१ओउ पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे, तर किमान तापमान २०ओउ च्या आसपास राहील. पहाटे आणि रात्री जाणवणारा गारवा आता ओसरला असून दुपारी उन्हाचा चटका जाणवण्यास सुरुवात झाली आहे.

स्थिती पाहता, आज दिवसभर मुख्यत्वे निरभ्र आणि कोरडे हवामान राहील. सकाळी ०७:०७ च वाजता सूर्योदय झाला असून, संध्याकाळी ०६:२८ झच वाजता सूर्यास्त होईल. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण साधारण ३०% ते ४०% दरम्यान असल्याने दुपारच्या वेळी काहीसा उकाडा आणि कोरडेपणा जाणवू शकतो.

हवामान तज्ज्ञांच्या मते, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे महाराष्ट्रातील वातावरणात हे बदल होत आहेत.

पुण्यात जरी आज पाऊस नसला, तरी उद्या म्हणजेच ३ फेब्रुवारी रोजी शहरात काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्येही ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. पुण्यातील हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक सध्या १६० ते १७० च्या दरम्यान म्हणजेच 'मध्यम' श्रेणीत आहे. वाढत्या उन्हामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळी बाहेर पडताना काळजी घ्यावी. पुढील काही दिवसांत तापमानाचा पारा वाढण्याची चिन्हे असून उन्हाळ्याची चाहूल लवकरच लागणार असल्याचे दिसत आहे.

# पाबळमधील विहिरीत सापडला मायलेकांचे मृतदेह; पतीच्या संशयापायी संसार उध्वस्त

### दोन चिमुकल्यांसह मातेची विहिरीत उडी

**पुणे, ता. २ :** पुणे जिल्ह्यातील पाबळ (ता. शिरूर) येथे घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या एका विवाहित महिलेने आपल्या दोन चिमुकल्या मुलांसह आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार रविवारी उघडकीस आला. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली असून, अनेकांना अश्रू अनावर झाले आहेत.

अहिला उर्फ भाग्यश्री राजू जाधव वय ३०, त्यांचा ५ वर्षांचा मुलगा सार्थक आणि अवघ्या ४ महिन्यांची मुलगी गौरी अशी या दुर्दैवी घटनेतील मृतांची नावे आहेत. जाधव कुटुंब मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील बीबी गावचे असून रोजगारासाठी काही काळापासून पाबळ येथील थोर स्थळ वस्ती परिसरात वास्तव्यास होते. अहिला या मजुरी करून घरखर्च चालवत होत्या.



मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी अहिला आणि त्यांचे पती राजू जाधव यांच्यात घरगुती कारणावरून वाद झाला. त्यानंतर अहिला आपल्या दोन्ही मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या. बराच वेळ होऊनही त्या घरी परत न आल्याने दुपारनंतर कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला.

दरम्यान, थोर स्थळ परिसरातील एका शेतातील विहिरीत प्रथम लहान मुलीचा मृतदेह आढळून आला. ही बातमी पसरताच परिसरात एकच खळबळ उडाली. पुढील शोधात त्याच ठिकाणी अहिला आणि त्यांच्या मुलाचाही मृतदेह आढळून आला. एकाच कुटुंबातील तीन जीव अशा प्रकारे निघून गेल्याने गावकऱ्यांना मोठा धक्का बसला.

प्राथमिक तपासात पतीकडून वारंवार संशय आणि त्यातून होणारे वाद यामुळे अहिला मानसिक तणावाखाली असल्याची माहिती पुढे आली आहे. या मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# हा तर श्रीमंतांचा अर्थसंकल्प! प्रकाश आंबेडकरांची बजेटवर जहरी टीका

**पुणे, ता. २ :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी रविवारी सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर केला. सरकारकडून हा अर्थसंकल्प विकसित भारतच्या दिशेने टाकलेले पाऊल म्हणून मांडला जात असताना, विरोधकांकडून मात्र त्यावर तीव्र टीका सुरू झाली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी या अर्थसंकल्पाला केवळ पोकळ दाव्यांचा दस्तऐवज म्हणत थेट शब्दांत सरकारवर हल्लाबोल केला आहे.

सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना प्रकाश आंबेडकर यांनी हा अर्थसंकल्प श्रीमंत वर्गासाठी तयार करण्यात आल्याचा आरोप केला. त्यांच्या मते, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजासाठी



कोणतीही ठोस धोरणात्मक तरतूद या अर्थसंकल्पात दिसून येत नाही. समाजातील मोठ्या घटकाच्या हितासाठी स्पष्ट दिशा देण्याऐवजी अर्थमंत्र्यांनी केवळ शब्दांचा खेळ केला असल्याचे त्यांनी नमूद केले.

मध्यमवर्गीयांबाबतही आंबेडकर यांनी सरकारची निराशाजनक भूमिका अधोरेखित केली. वाढती महागाई, दैनंदिन खर्चाचा ताण आणि कर सवलतीची अपेक्षा असताना या अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीयांना कोणताही प्रत्यक्ष दिलासा मिळालेला नाही, अशी टीका त्यांनी केली. महागाईपासून सामान्य नागरिकांना संरक्षण देण्यासाठी ठोस उपाययोजना नसल्याने हा अर्थसंकल्प जमिनीवर परिणाम करणारा ठरत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरही प्रकाश आंबेडकरांनी सरकारला घेरले. किमान आधारभूत किमतीला कायदेशीर संरक्षण देण्याबाबत पुन्हा एकदा कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्न स्थैर्याबाबतचा मूलभूत प्रश्न कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आर्थिक धोरणांच्या बाबतीतही आंबेडकरांनी चिंता व्यक्त केली. रुपयाचे घसरते मूल्य, परकीय भांडवलाचा कमी होत असलेला ओघ यासारख्या गंभीर प्रश्नांकडे अर्थसंकल्पात दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटक यांसारख्या बिगर-भाजप शासित राज्यांना त्यांच्या हक्काचा वाटा न दिल्याने केंद्र सरकारची पक्षपाती भूमिका उघड झाल्याचे ते म्हणाले. एकूणच, सरकार विकासाचा दावा करत असताना समाजातील दुर्बल घटक, शेतकरी आणि मध्यम वर्ग यांच्या अपेक्षा अपूर्ण राहिल्या असल्याचे चित्र प्रकाश आंबेडकर यांच्या टीकेतून स्पष्टपणे समोर येते.

## ५ जणांचा मृत्यू झाला, पण पायलट जिवंत? अपघात प्रकरणातील गौप्यस्फोट

**पुणे, ता. १ :** महाराष्ट्राचे राजकारण ढवळून काढणाऱ्या अजित पवार यांच्या विमान अपघाताने राज्य अद्याप सावरलेले नाही. पण या भीषण दुर्घटनेनंतर सोशल मीडियावर पसरलेल्या एका चुकीच्या माहितीने नव्या वादाला आणि गोंधळाला जन्म दिला. ज्या वैमानिकाचे नाव अपघातात मृत म्हणून व्हायरल झाले, तो प्रत्यक्षात जिवंत असल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

बुधवारी 'लिअरजेट ४५' या विमानाने मुंबईहून बारामतीसाठी झेप घेतली. अपघातानंतर विमानाचे 'मूव्हमेंट लेटर' (नियोजनाचे पत्र) सोशल मीडियावर लीक झाले. या पत्रावर कॅप्टन साहिल मदान आणि कॅप्टन यश यांची नावे पायलट म्हणून नोंदवलेली होती. ही माहिती अधिकृत मानून हजारो नेटिझन्सनी कॅप्टन साहिल मदान यांचे फोटो शोधून त्यांना श्रद्धांजली वाहण्यास सुरुवात केली.



विमानाने उड्डाण करण्यापूर्वी शेवटच्या क्षणी वैमानिकांची अदलाबदल करण्यात आली होती. मूळ नियोजनानुसार कॅप्टन साहिल मदान जाणार होते, पण काही अपरिहार्य कारणास्तव ही जबाबदारी कॅप्टन सुमित कपूर यांच्याकडे सोपवण्यात आली. नियतीचा खेळ असा की, ज्यांनी ऐनवेळी जबाबदारी स्वीकारली, त्याच सुमित कपूर यांचा या भीषण अपघातात अंत झाला.

कॅप्टन साहिल मदान यांचा फोटो 'मृतांच्या' यादीत फिरू लागल्यानंतर त्यांच्या पत्नी, प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट संजाम सहनी यांनी इन्स्टाग्रामवर संताप व्यक्त केला. कृपया या अफवा थांबवा, माझे पती त्या विमानात नव्हते आणि ते पूर्णपणे सुरक्षित आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

# साहेब एकत्र येतील हीच भीती होती; सुनेत्रा पवारांच्या शपथविधीमागे 'पार्थ पवार'?

### साहेबांच्या आधी 'त्रिमुर्तींनी' डाव उलटवला

**पुणे, ता. २ :** अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारण अतिशय वेगाने बदलले आणि त्यातून अनेक प्रश्न, संशय आणि विरोधाभासी दावे समोर आले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी उघडपणे सांगितले की अजित पवार यांच्याशी विलिनीकरणाची चर्चा अंतिम टप्प्यात होती आणि १२ तारखेला त्याची अधिकृत घोषणा करण्याचा विचार होता. मात्र दुसरीकडे, दादा गटातील वरिष्ठ नेते अजित पवार यांनी अशा कोणत्याही चर्चाच केल्या नसल्याचा दावा करत आहेत. या दोन परस्परविरोधी भूमिकांमुळेच अजित पवार यांच्या निधनानंतर घडलेल्या घटनांकडे संशयाच्या नजरेने पाहिले जात आहे.

अजित पवार यांच्या मृत्यूनंतर शोक व्यक्त करण्यासाठी वेळ देण्याऐवजी, अवघ्या काही तासांत नेतृत्वाचा प्रश्न पुढे आणला गेला आणि सुनेत्रा पवार यांचा शपथविधी घाईघाईत उरकण्यात आला. राजकीय जाणकारांच्या मते, यामागे शरद पवार यांना जाणूनबुजून बाजूला ठेवण्याची रणनीती होती. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे ही नावे या हालचालींमध्ये आघाडीवर असल्याचे बोलले जाते. विशेष म्हणजे, या सगळ्या निर्णयांना अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांचा पाठिंबा असल्याची माहिती पुढे



येत आहे. अजित पवार स्वतः वेगळे राहून राजकीय नुकसान होत असल्याचे मानत होते आणि संघर्षाऐवजी एकत्र येऊन विकासाचे राजकारण करण्याची इच्छा त्यांनी जवळच्या सहकाऱ्यांकडे व्यक्त केली होती. शरद पवार, जयंत पाटील आणि शशिकांत शिंदे यांच्याशी त्यांनी यावर चर्चा केल्याचेही सांगितले जाते. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकांत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणे हा त्याच प्रक्रियेचा भाग होता. मात्र हे एकत्र येणे पार्थ पवार यांना मान्य नव्हते आणि त्यांनी खासगीत नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे.

राजकीय वर्तुळात अशीही चर्चा आहे की, शपथविधीला उशीर झाला असता तर शरद पवार आपल्या अनुभवाच्या जोरावर विलिनीकरणाची समीकरणे जुळवून आणू शकले असते, ही भीती दादा गटातील नेत्यांना होती. त्यामुळे बारामतीतील एका बैठकीत दोन दिवसांत शपथविधी करण्याचा निर्णय झाला. या प्रक्रियेत पार्थ पवार यांच्याशी चर्चा झाली आणि त्यानंतरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत हा संदेश पोहोचवण्यात आला, अशी माहिती आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीमागे केवळ परिस्थितीचा नव्हे, तर सुनियोजित राजकीय गणितांचा मोठा वाटा असल्याचे चित्र आता स्पष्ट होत आहे.